`

बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २० मार्च २०२५**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५१/२०२४ भा.न्या.सहिंता कलम १३२,२२१(१),३५२,३५१(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १९/०३/२०२५ रोजी १६.३५ वा चे सुमारास, प्रजा मटण स्टॉलचे बाजुला, रामलाल चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०३/२०२५ रोजी २३.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/ २३४ दिनेश नारायण घंटे, नेम- फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | नाईन्टया ऊर्फ ओंकार संतोष नलावडे, रा. सुंदराबाई डागा प्रशालेच्या जवळ, बांद वस्ती, दमाणी नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत व इतर दोन ते तिन इसम यांचेत तक्रार चालु होती. वरील आरोपीत हा स्वत:हुन रस्त्याचे कडेला असलेल्या फुटपाथवर स्वत:चे डोके व तोंड आपटुन घेत असल्याने त्याचे डोक्यातुन रक्त येत होते. वरील आरोपीत यास रिक्षातुन पोलीस ठाणे येथे आणत असताना रिक्षा मध्ये फिर्यादीच्या अंगावर थुकुन शिवीगाळ करुन फिर्यादीच्या शर्टाला धरुन ओढा ओढी केली. पोलीस ठाणे येथे उपचाराची वैदयकीय यादी तयार करीत असताना वरील आरोपीताने शिवीगाळ करुन परत अंगावर थुंकला. आरोपीत हा आरडाओरड करीत असताना वपोनि अरविंद माने सर यांनी त्यास शांत बसण्यास सांगत असताना त्याने माने सरांचे छातीवर डावे बाजुस हाताने बुक्की मारली सर त्यास अडवत असताना त्याने हाताने त्यांचे उजव्या हाताचे मनगटा जवळ मारल्याने त्यांना जबर मुका मार लागला आहे. सदर इसमाने पोलीसांचे शासकिय कामात अडथळा आणुन फिर्यादीस धक्का बुक्की करुन वपोनि माने सर यांचे छातीवर मारुन जबर दुखापत केली आहे म्हणून. तपास:- सपोनि- जाधव- ९८५०९७५९२० |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १५०/२०२४ भादवि ४२०,४०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०१/१२/२०२३ रोजी ते दि. ०३/०२/२०२४ रोजी चे दरम्यान अवसे वस्ती, आमराई, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०३/२०२५ रोजी २३.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सविता भगवान खरात, वय- ३३ वर्षे, मु. पो बाज ता. जत जि. सांगली |
| **आरोपीचे नाव** | : | १) विजय बोंडवे, रा. मु. पो निडळ, ता. खटाव, जि. सातारा, २) त्याचे इतर अज्ञात साथिदार |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील विनोद राहुल वाघमारे यांचे आवसे वस्ती येथिल सामाजिक कार्याच्या ऑफिसमध्ये आलेले नोकरीच्या शोधात असणारे फिर्यादी व इतर ६ लोकांना यातील आरोपीत क्रं. १ याने त्याची स्वत:ची भारतीय काँग्रेस संघटना नावाची पुणे येथे संघटना असल्याचे सांगुन पुणे महानगरपालिका येथे लिपीक, परीचारीका व इतर शासकीय, निमशासकीय पदावर |

| | | |
|---|---|---|
| | | कर्मचारी भरती करण्याचे काम करण्यात येत असलयाचे भासवुन लोकांना व्हॉटस ॲपवर मेसेज व्दारे विना सही शिक्याचे नोकरीसाठी निवड यादीचे कार्यालयीन आदेश पाठवुन त्याचा विश्वास संपादन करुन त्याचे संघटनेची फि म्हणून २ लाख रु दयावे लागतील असे सांगुन फिर्यादी व इतर लोकांकडुन टप्या टप्याने एकुण- १९,२०,०००/- रुपये स्वत:चे पत्नीचे व मुलाचे बँक खात्यावर ऑनलाईन माध्यमातुन व रोखीने घेवून नोकरीचा कोणताही आदेश न देता फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- पोनि- दराडे- **८३९००९००९९** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ११०९/२०२४ भा. न्याय संहिता क ११८(१),११५(२),३५२,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १८/०३/२०२५ रोजी २०.३० वा चे सुमारास, आंबेडकर चौक, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०३/२०२५ रोजी ०३.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनंदा राजु गोतसुर्वे, वय- ४५ वर्षे, रा. सर्वसुखी नगर, निर्मीती विहार जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) श्वेता, २) निता, रा. आंबेडकर चौक, सोलापूर, ३) एक अज्ञात व्यक्ती |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचा भाचा प्रतिक याची क्लासेस समोर लावलेली सायकल कोणीतरी घेवून गेली आहे ते चिवरीकर सरांना सीसीटीव्ही कॅमेरा बघुन सांगा असे विचारण्याकरीता गेले असता सर यांचे दोन मुली यातील वरील आरोपीत यांनी सिमा गायकवाड हिस शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली. त्यावेळी तेथे थांबलेला अज्ञात व्यक्ती मागुन येवून फिर्यादीचे डोक्यात लाकडी दांडका मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ- १०४२ सोनार- |